MHBI140004652020

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Presented on | : | 04 / | 03 / | 2020 |
| Registered on | : | 05 / | 03 / | 2020 |
| Decided on | : | 18 / | 05 / | 2026 |
| Duration | : | Y. | M. | Days |
| | | 06 | 02 | 14 |

## न्यायालय विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, आष्टी यांचे न्यायालयात

(के. के. खोमणे, पिठासीन अधिकारी)

**फौजदारी किरकोळ. अर्ज क्र.८१/२०२०** **निशाणी क्र.३३**

१) **रूपाली भ्र. गणेश पवार**
वय – २९ वर्षे, धंदा – घरकाम

२) **यश पि. गणेश पवार**
वय – ०८ वर्षे, धंदा शिक्षण
अ.पा.क. अर्जदार नं १ सख्खी आई

३) **आदेश पि. गणेश पवार**
वय – ०४ वर्षे, धंदा शिक्षण
अ.पा.क. अर्जदार नं १ सख्खी आई

४) **गौरी पि. गणेश पवार**
वय – १ १/२ वर्षे, धंदा काही नाही
अ.पा.क. अर्जदार नं १ सख्खी आई
सर्व रा. बेल्हेकर गल्ली, जामखेड ता. जामखेड
जि. अहमदनगर ह.मु. मातकुळी ता. आष्टी जि.
बीड. **... अर्जदार**

**– विरुध्द –**

१) **गणेश शिवाजी पवार**
वय – ३२ वर्षे, धंदा – मिस्तरी काम ,

२) **शिवाजी शेटीबा पवार**

वय – ६० वर्षे, धंदा – मजुरी,

३) **सत्यभामा भ्र. शिवाजी पवार**
वय – ५०वर्षे, धंदा – घरकाम,
सर्व रा. बेल्हेकर गल्ली, जामखेड ता. जामखेड
जि. अहमदनगर **...सामनेवाला**

.....................................................................................................

**अर्ज** :– कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ नुसार.

.....................................................................................................

**विधीज्ञ** :– श्री. आर.आर. हंबर्डे .... अर्जदारांकरीता.
श्री. यु. आर. पोकळे .... सामनेवाला करीता.

.....................................................................................................

## न्या य नि र्ण य

(दिनांक १८ मे , २०२६ रोजी घोषीत)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ नुसार दाखल केला आहे.

### अर्जदारांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे :–

**२.** अर्जदार नं १ चा विवाह सा.वाला क्र. १ बरोबर दिनांक १३/१२/२००९ रोजी मौजे मातकुळी ता. आष्टी जि.बीड येथे हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे व रितीरिवाजानुसार झालेला आहे. लग्नामध्ये अर्जदार क्र. १ चे आई – वडिलांनी सर्व संसार उपयोगी वस्तु देवुन मोठ्या थटामाटात सदरचे लग्न करून दिलेले आहे. लग्नात सुमारे दीड लाख रूपये खर्च अर्जदार हिचे आई वडिलांना आला. अर्जदार क्र. १ व सा.वाला क्र. १ हि सासरी मौजेजामखेड ता. जामखेड जि. अहमदनगर येथे नांदण्यास गेली असता सासरी घरामध्ये पती –सा.वाला क्र. १ सासरा– सा.वाला.

क्र. २ व सासु– सा.वाली यांनी अर्जदार हिस तीन वर्षे कसेबसे बरे नांदवले दरम्यानच्या काळात अर्जादार क्र. १ हिस सा.वाला क्र. १ पासुन मुलगा नामे यश [अर्जदार क्र. २] हा झाल. त्यानंतर अर्जदार हिचा सासरच्या लोकांनी मानसिक व शारीरिक छळ करण्यास सुरूवात केली.

**३.** अर्जदार कथन करते की, सा.वाले क्र. २ व ३ अर्जदार हिस म्हणत असे की, लग्नात आमचा नीट मानपान झला नाही. तसेच हे की, अर्जदार क्र. १ चा विवाह सा. वाला. क्र. १ बरोबर दिनांक –१३/१२/२००९ रोजी मौजे मातकुळी ता. आष्टी जि. बीड येथे हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे व रितीरिवाजानुसार झालेला आहे. लग्नामध्ये अर्जदार क्र.१ चे आई – वडिलांनी सर्व संसार उपयोगी वस्तु देवुन मोठ्या थाटामाटात सदरचे लग्न करून दिलेले आहे. लग्नात सुमारे दीड लाख रूपये खर्च अर्जदार हिचे आई वडिलांना आला. अर्जदार. क्र. १ व सा.वाली क्र. ३ असे एकत्रात राहत होते. तसेच नणंद व नंदवा हे सतत सासर व माहेर जवळ असल्याने अर्जदार हिचे घरी ये जा करत होते. सासरी सा.वाले यांनी अर्जदार हिस तीन वर्षे कसेबसे बरे नांदवले दरम्यानच्या काळात अर्जदार क्र. १ हिस सा.वाला क्र. १ पासुन मुलगा नामे यश अर्जदार क्र. २ हा झला. त्यानंतर अर्जदार हिचा सासरच्या लोकांनी मानसिक व शारीरिक छळ करण्यास सुरुवात केली.

**४.** अर्जदार कथन करते की, सा. वाले क्र. २ व ३ अर्जदार हिस म्हणत असे की, लग्नात आमचा नीट मानपान झाला नाही तसेच आम्हाला हुंडा मिळाला नाही या कारणावरुन अर्जदार हिस पमानास्पद वागणुक देण्यास व शिवीगाळ करण्यास व मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर अर्जदार हिस वा.वाला क्र. १

पासुन दुसरा मुलगा नामे आदेश अर्जदार क्र. ३ हा झला तरी देखील सा. वाले हे अर्जदार हिस त्रास देत असे. सा.वाल क्र. १ हा दारू पिवुन येवुन विनाकारण अर्जदार क्र. १ हिस मारहाण करत असत. अर्जदार हिची माहेरची परिस्थिती गरीबीची असल्याने अर्जदार हि सासरी होणारा त्रास सहन करत तशीच नांदत राहीली. सा.वाले हे अर्जदार हिस म्हणत असे की, तु तुझ्या वडिलांकडुन आर.सी.सी. बांधकामाच्या नवीन वस्तु घेण्यासाठी १,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार) रूपये घेवुन ये, अशी पैशाची मागणी करू लागले. अर्जदार हिची माहेरची परिस्थिती गरीबीची असल्याने अर्जदार हिने पैसे देण्यास असमर्थता दर्शविल्याने सा.वाले हे अर्जदार हिस अपमानास्पद वागणुक देत असत. दरम्यानचे काळात अर्जदार क्र. १ हिस सा.वाला. क्र. १ पासुन मुलगी नामे गौरी अर्जदार क्र. ४ हि झाली. त्यानंतर सा.वाला क्र. १ हा अर्जदार क्र. १ हिचे चारित्र्यावर संशय घेवू लागला व दारू पिवुन येवुन अर्जदार हिस मारहाण करु लागला. सदरची घटना अर्जदार हि माहेरी सणावाराला आल्यानंतर तिच्या आई – वडिलांना व नातेवाईकांना सांगत असे परंतु ते अर्जदार हिची समजुत काढुन अर्जदार हिस पुन्हा नांदायला पाठवत असे.

५. अर्जदार कथन करते की, मागील वर्षी पोळ्याचे सणाचे दिवशी तु कोणा बरोबर आहे असे म्हणुन सा.वाला क्र.१ याने त्याचे राहते घरी अर्जदार हिस जबर मारहाण केली व अर्जदार हिची आई जानकाबाई सोडवा सोडव करायला आली असता तिला देखील सा. वाला यांनी मारहाण केली. त्यांनतर अर्जदार हिस सा.वालेंचा त्रास सहन न झाल्याने अर्जदार क्र.१ हि गोचीड मारण्याचे विषारी औषध पिवुन जिवे मरण्याचा प्रयत्न अर्जदार हिने केला होता. तेव्हापासुन अर्जदार क्र. १ हि

तिन्ही मुलांसह माहेरी राहते. त्यानंतर अर्जदार क्र. १ हिचे आई – वडिल व नातेवाईकांनी अनेकवेळा अर्जदार हिस चांगले नांदविण्याबाबत सा.वाले यांचेकडे विनंती केली. परंतु त्यांच्याकडे देखील सा.वाले यांनी दीड लाख रुपये ची मगणी केली व त्यांना घराच्या बाहेर हाकलुन दिले. त्यामुळे अर्जदार हि नाविलाजाने लहान मुलांसह माहेरी राहत आहे. अर्जदार कथन करते की, सा.वाला याला उत्पन्नाचे पुरेसे साधन असुन देखील त्याने त्यांच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी स्विकारली नाही म्हणुन अर्जदार क्र. १ ते ४ यांना रक्कम रु. १५,०००/– दरमहा पोटगीची आवश्यकता आहे. अर्जदार करीता निवासी आदेश नुकसान भरपाई बाबत रक्कम मिळण्याकरीता विनंती करण्यात आली. अर्जदारतर्फे अर्ज मंजुर करण्याची विनंती करण्यात आली.

६. सामनेवाला यांना नोटीस काढण्यात आली. सामनेवाला क्र.१ प्रकरणामध्ये हजर राहिला. सा.वाला यांनी नि.क्र २४ वर म्हणणे दाखल करून हरकत नोंदविली आहे. अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दिनांक १३/१२/२००९ रोजी मौजे मातकुळी तालुका आष्टी जिल्हा बीड येथे शाळेत हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे अगदी साध्या पध्दतीत झाला आहे. अर्जदार हिचे वडीलांचे भावकितील तीन लग्न एकत्रात झलेले आहेत. अर्जदार हिचे आई–वडिलांची परिस्थिती अगदी साधारण असल्यामुळे काही एक देवाणघेवाण न करता लग्नासाठी सामने वाला यांनी ५०,०००/– रूपये देऊन अर्जदार हिस संपूर्ण दाग दागिने सामनेवाला यांनी केले आहेत. एकुलती एक पोरगी असल्यामुळे लग्न दारात नाही केल्यास लोक नाव ठेवतील म्हणून अर्जदार हिचे आई–वडिलांचे सांगणे वरून लग्न

मातकुळी येथे केलेले आहे. वास्तविक पाहता लग्नाचा संपूर्ण खर्च सामने वाला यांनी केला आहे. लग्नात सामनेवाली यांनी अर्जदार हिस नेकलेस, कानातील बाजीगर, कानातील वेल, गंठन, मनी मंगळसूत्र व इतर सर्व दाग दागिने केले आहेत.

७. सामनेवाला कथन करतात की, लग्नानंतर अर्जदार ही सासरी जामखेड येथे आल्यानंतर नाराज राहू लागली. तसेच सानेवाला यांना म्हणू लागली की, सामनेवाला क्र. १ हा काळा असल्यामुळे मला आवडत नव्हता परंतु आई–वडीलांचे खतीर मी तुमचे सोबत लग्न केले आहे. मला येथे करमत नाही, त्यामुळे अर्जदार ही सतत माहेरी राहत असे. त्यानंतर सामनेवाला याची आई सामनेवाला यास समजावून सांगत असे की, अर्जदार ही अजून खपू लहान आहे, तिच्या वागण्यात बदल होईल, हे आईचे ऐकून सानेवाला हा तिला माहेरी राहू देत असे, परंतु अर्जदार ही सासरी कम माहेरी जास्त राहू लागली. त्यानंतर सामनेवाला हा अर्जदार हिस घेऊन जात असे. अर्जदार ही दहा ते पंधरा दिवस सासरी राहून पुन्हा माहेरी राहायला जात असे, दरम्यानच्या काळात सामनेवाला क्र. १ पासून अर्जदार क्र. १ हीस पहिला मुलगा नामे यश झाला.

८. सामनेवाला असे कथन करतात की, पहिला मुगला झाल्यानंतर अर्जदार ही सासरी नांदण्यास आली. अर्जदार ही एकुलती एक असल्याने आई–वडिलांची लाडकी लेक आहे, त्यामुळे तिचा सासरी देखील सामनेवाले हे खूप लाड करत असत, तसेच अर्जदार हिचे लहानपणी लग्न झाले असल्यामुळे तिला काही एक काम न करता सामनेवाल हे सांभाळत असत, परंतु पहिला मुलगा झाल्यानंतर अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांना वेगळे ठेवत असाल तर नांदण्यास

पाठवतोत अशी अट घातल्यामुळे सामनेवाला क्र. १ व अर्जदार क्र. १ ही आई वडील व इतरांपासून वेगळे राहू लागले. त्यानंतर सामनेवाला क्र. २ ते ३ हे त्यांच्या दुस–या मुलांकडे राहू लागले.

९. सामनेवाला असे कथन करतात की, दरम्यानच्या काळात सामनेवाला हा कामाला गेल्यानंतर अर्जदार ही सतत फोनवर बोलत असे. त्यामुळे सामनेवाला याने त्याचे मोबाईल मध्ये रेकॉर्डिंग चालू करून मोबाईल अर्जदार हिस दिला. तेव्हा सामनेवाला यांच लक्षात आली की, अर्जदार हिचे माहेरी एका मुलासोबत सतत फोनवर बोलणे चालू आहे. तसेच माहेरच्या मुलासोबत अर्जदार हिचे अफेअर चालू आहे. तेव्हा सामने वाला याने अर्जदार हिस समजावून सांगितले व बाहेरचे अफेअर आता बंद कर आपल्याला मुलगा झाला आहे. असे समजावून सांगितले त्यावर अर्जदार ही तयार झाली. याबाबत सामनेवाला नंतबर एक याने अर्जदाराचे आई–वडिलांना देखील ही बाब सांगितली होती, त्यांनी देखील अर्दार हिस समजावून सांगितले होते.

१०. सामनेवाला कथन करतात की, सामनेवाला क्र. १ व अर्जदार क्र. १ ही वेगळी राहत असताना सामनेवाला क्र. १ पासून दरम्यानची काळात अर्जदार क्र. १ हीस दुसरा मुलगा नामे आदेश झाला. त्यावेळी सामनेवाला बाहेरगावी कामाला जात असे तसेच सामनेवाला क्र. १ हा बाहेर कामाला गेल्यानंतर अर्जदार क्र. १ ही सतत फोनवर बोलत असे तसेच वेगळे राहत असल्यामुळे घरी कोणालाही बोलावून घेत असे सामनेवाला यास शेजारी व आई वडील सांगत असत परंतु सामनेवाला क्र. १ यांचा अर्जदार क्र. १ वर खूप विश्वास व प्रेम असल्यामुळे त्याला त्या गोष्टी ख–या

वाटत नसत दरम्यानचे काळात अर्जदार क्र. १ हिस सामनेवाला क्र. १ पासून एक मुलगी नामे गौरी झाली. अर्जदार क्र. १ ही सतत सामनेवाला यास घालून पाडून बोलत असे तसेच तू खपू काळा आहेस मला आवडत नसताना आई–वडील यांचे खातीर मी लग्न केले असे म्हणून टोमणे मारत असे. परंतु अर्जदार क्र. १ ही सामनेवाला यापेक्षा दिसायला चांगली असल्याने व त्यामानाने सामनेवाला हा कुरूप असल्याने समाजात आपल्याला परत पोरगी कोण देणार नाही. यामुळे सामनेवाला क्र. १ हा सर्व अर्जदार हिचा त्रास सहन करून जीवन जगत राहिला.

**११.** सामनेवाला असे कथन करतात की, दरम्यानचे काळात सामनेवाला हा कामाला बाहेर जाणे बंद झाला. तसेच सामनेवाला यास अर्जदार कामधंदा करणे बंद झले. त्यामुळे सामने वाला जामखेड येथे छोटे मोठे काम करून आपली व आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवु लागला. एके दिवशी सामनेवाला हा कामाला घराबाहेर गेला असता दुपारी घरी आला तेव्हा घराचा दरवाजा लावून अर्जदार क्र. १ ही गल्लीतील राजू वीटकर नावाच्या मुलासोबत घरात नको त्या अवस्थेत होती. ही घटना प्रत्यक्ष सामनेवाला क्र. १ याने त्याच्या डोळ्यांनी पाहिली, तेव्हा सामनेवाला क्र. १ यास चक्कर आली तसेच सामन्यावाला हा आई–वडील यांच्याकडे जाऊन त्यांना हा प्रकार सांगितला त्यानंतर संध्याकाळी जेवण न करता झोपला. तसेच अर्जदार क्र. १ हीस काहीही बोलला नाही अर्जदार क्र. १ हिने त्याच दिवशी दिनांक ३०.०८.२०१९ रोजी रात्री ०१:०० वाजता दिवसा झालेल्या घटनेचा पश्चाताप म्हणून घरातील विषारी औषध प्राशन केले. त्योवळी सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदार हिस हिशलादिप हॉस्पीटल जामखेड येथे लगेच उचलून दवाखान्यात नेले. अर्जदार

हिस सामनेवाला याने एक लाख रूपये खर्च करून बरे केले. त्यानंतर अर्जदार क्र. १ हीच घरी सोडून घेऊन गेले.

**१२.** सामनेवाला असे कथन करतात की, अर्जदार हिस दवाखान्यातून घेऊन परत घरी आल्यानंतर अर्जदार हिचे आई–वडील व सर्वजण येऊन भेटून गेले. त्यानंतर सामनेवाला याने दवाखान्याचे झालेले कर्ज फेडण्यासाठी अर्जदार हिचे नावावर एच यु गुगळे पतसंस्थेकडून ४८,०००/– रूपये कर्ज काढले. सदरचे पैसे घरात आणून ठवेले असताना अर्जदार ही घरातील सर्व पैसे, सर्व दाग दागिने घेऊन मुलांना घेऊन माहेरी निघून गेली. त्यानंतर सामनेवाला यांनी अर्जदार हिस नांदण्यासाठी खूप विनंती केल्या, तरी अर्जदार ही नांददण्यास आली नाही. अर्जदार हिने सामनेवाला यांचे कडे नांदण्यास स्पष्ट नकार दिला. त्यानंर अर्जदार हिने केस केल्या आहेत. कर्जाचे संपूर्ण हप्ते सा.वाला क्र. १ ने भरले.

**१३.** सामनेवाला असे कथन करतात की, अर्जदार ही नांदण्यास येत नाही सामनेवाला हा खूप एकाकी जीवन जगत आहे. अज्रदार हिने सामनेवाला क्र. १ यास त्रास दिल्यामुळे सामनेवाला यास डायबिटीस व थायरॉईड झालेला आहे. अर्जदार हिस सांभाळण्याची प्रमाणिक सामनेवाला क्र. १ ची इच्छा आहे. परंतु अर्जदा हिची सामनेवाला क्र. १ सोबत प्रामाणिक राहण्याची इच्छा नाही. त्यामुळे सामनेवाला याची खूप मानसिक संतुलन बिघडले आहे. सामनेवाला हा कोठेही काही एक काम धंदा करत नाही. भनाभना फिरत राहतो, तसेच सामनेवाला क्र. १ ला आजारपणासाठी खूप खर्च येत आहे. त्यातच अर्जदार ही सोडून गेल्याने सामनेवाल्याचे खाण्यापिण्या चे खुप हाल होत आहेत. सामनेवाला यास उत्पन्नाचे

कोणतेही साधन नाही. तसेच सामनेवाला क्र. १ चे आई–वडील वयोवृध्द झाले आहेत. त्यांना सांभळण्याची जबाबदारी त्याचे वर आहे. त्यामुळे सामनेवाले हे खुप हालाखचे जीवनात जगत आहे. तसेच सा.वाला क्र. १ याच्या बहिणीला पाच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत.

**१४.** सामनेवाला असे कथन करतात की, त्यामुळे अर्जदार हिचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा. तसेच सामनेवाला हा अर्जदार यांना सांभळण्यास, घेऊन जाण्यास व चागले नांदवण्यास तयार आहे. तसेच सामनेवाला याची अर्जदार सोबत प्रमाणिक संसार करण्याची तयारी आहे. तसेच अर्जदार क्र. २ ते ४ यांना शिक्षणासाठी जामखेड येथे राहणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार क्र. २ यास रोज जामखेडला एसटीने शाळेत यावे लागते.

**१५.** सामनेवाला असे कथन करतात की, अर्जदार एक हिचे मशीन क्लास झला आहे. तिला चांगल्या प्रकारे ब्लाऊज शिवायला येतात. त्यापासुन तिला चांगले उत्पन मिळते तसेच अर्जदार हिचे माहेरी मोठ्या प्रमाणात मजुरीने कामे मिळतात. अर्जदार हिस ४००/– रुपये रोज मजुरी मिळते. त्यामुळे अर्जदार ही माहेरी खूप मजेत जीवन जगत आहे. तसेच अर्जदार हिचे वडिलांची शेती आहे. अर्जदार ही त्यांना देखील शेतात मदत करते. त्यामुळे सर्व खर्च अर्जदारचा टेकीत चालला आहे. अर्जदार हिचा सामनेवाला याने स्वतःहून त्याग केलेला नाही तरी अर्जदार हिने स्वतःहून सामनेवाल क्र. १ चा त्याग केलेला आहे. सामनेवाला यास कुठलेही व्यसन नाही त्यामुळे सामनेवाला हा अर्जदार हिस नांदवण्यास तयार आहे अर्जदारांना पोरगी देण्याची ऐपत नाही. त्यामुळे अर्जदार हिचा अर्ज खचार्सह नामंजूर करण्यात यावा .

**१६.** अर्जदार तर्फे विधीज्ञाचा युक्तीवाद ऐकण्यात आला. सामनेवाला आणि त्यांचे विधीज्ञ युक्तीवादकरीता गैरहजर. सामनेवाला यास युक्तीवादाची संधी देण्यात आली परंतु सामनेवाला तर्फे युक्तीवाद करण्यात आला नाही. त्यामुळे प्रकरण न्याय निर्णय करीता नेमण्यात आले.

**१७.** दोन्ही बाजूच्या कथनांवरुन आणि अर्जदार तर्फे विधीज्ञांचे युक्तीवादावरुन माझ्या समोर खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात त्या मुद्दयांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सामनेवाला यांनी अर्जदारवर कौटुंबीक हिंसाचार केला असे अर्जदार शाबीत करते काय ? | होय. |
| २. | अर्जदार ही तिच्या विनंतीनुसार संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| ३. | अर्जदार ही सामनेवाला क्र.१ याचेकडून तिच्या करीता व अर्जदार क्र.२ ते ४ करीता मागणी केल्याप्रमाणे दरमहा पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. अर्जदार क्र.१ हिला दरमहा रक्कम रु.२,५००/- आणि अर्जदार क्र.२ ते ४ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.१,५००/-. |
| ४. | अर्जदार ही सामनेवाला क्र.१ याचेकडुन घर भाडे मिळण्यास पात्र आहे काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ५. | अर्जदार ही तिच्या शारिरीक, मानसिक व कौटुंबीक त्रासाबद्दल सामनेवाला क्र.१ कडून नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास रक्कम किती? | होय. |
| ६. | आदेश काय ? | अर्ज अंतिम आदेशानुसार अंशतः मंजूर. |

## <u>का र ण मी मां सा</u>

**<u>मुद्दे क्र.१ व २ करीता</u>** :-

**१८.** प्रस्तुतचे दोन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर मुद्दे विवेचनासाठी एकत्रितरित्या घेण्यात आलेले आहेत.

**१९.** अर्जदार हिने तिच्या म्हणण्याच्या पृष्टयर्थ स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.११ वर दाखल केलेले आहे. नि.१२ वरील आदेशान्वये अर्जदाराचा त्यांनी पुरावा बंद केलेला आहे.

**२०.** अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. आर.आर.हंबर्डे यांनी अर्जदारांतर्फे सरतपास शपथपत्र तसेच अर्ज हाच अंतीम युक्तीवाद म्हणुन समजण्यात यावा असे कळविले आहे.

**२१.** सामनेवाला यांना सदर अर्जाकामी वारंवार संधी देवुन देखील त्यांनी युक्तीवाद केला नाही. त्यामुळे अर्ज सामनेवालांच्या युक्तीवादाविना निकालाकरीता ठेवण्यात आला.

**२२.** प्रस्तुत सामनेवाला यांचे विरुध्द कौटूंबीक हिंसाचाराबाबत मागणी मान्य होवुन मिळण्याकरीता अर्जदारने तिचे सरतपास शपथपत्र नि.क्र.११ वर दाखल करुन कथन केले आहे की, तिचा विवाह सामनेवाला क्र.१ समवेत झाला. लग्न संबंधातुन त्यांना अर्जदार क्र.२ ते ४ ही मुले झाली आहे. अर्जदार कथन करते की, सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी स्वीकारली नाही. सामनेवाला क्र.१ ची आर्थिक चांगली असुन तो मिस्त्री काम करत असून त्यापासुन त्याला दरमहा रक्कम रु.२०,०००/- ते रू २५,०००/- उत्पन्न मिळते. तसेच, सामनेवाला क्र २ हा मजूर काम करत असून त्याला प्रती महिना १५ ते २० हजार मिळतात. अर्जदार यांना अन्न, वस्त्र व निवाऱ्याचा खर्च म्हणुन रक्कम रु.१५,०००/- पोटगीची आवश्यकता आहे. त्यामुळे सामनेवालांची अर्जदाराला संरक्षणात्मक आदेश, पोटगी व नुकसान भरपाई देण्याची त्यांची ऐपत आहे. अर्जदारातर्फे साक्षीदाराचा उलटतपास सा.वाला यांच्यामार्फत घेण्यात आला परंतु साक्षीदाराने उलटतपासात कोणतीही सुचना मान्य केली नाही. एकंदरीत अर्जदारचा तोंडी पुरावा हा सामनेवाला यांनी आव्हानीत केला नाही. सदर साक्षीदाराचे सरतपासामध्ये सामनेवालांनी अर्जदार हिचेवर कौटुंबीक हिंसाचार केल्याचे कथन आहे. सदरचे कथन सामनेवालांनी तोंडी पुरावा दाखल करुन खोडुन काढले नाही. तसेच सा.वाला क्र. १ याने त्याचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. २८ वर दाखल केले आहे. परंतु साक्षीदार त्याच्या उलटतपासाकरीता न्यायालयात गैरहजर असल्याने त्याचा तोंडी पुरावा न्यायनिर्णयाकामी वाचण्यात आला नाही. अर्जदारने कथन केले आहे की, सामनेवाला यांनी तिची शारिरीक, मानसिक आणि आर्थिक छळवणुक केली. सदर पुरावा विनाआव्हाणीत राहिला आहे. यावरुन असे निदर्शनास येते की,

अर्जदार हिच्यावर कौटुंबीक हिंसाचार सामनेवालांनी केला आहे. त्यामुळे अर्जदारा संदर्भात संरक्षण आदेश होणे न्यायोचीत वाटत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीता कारणमिमांसा</u>** :-

**२३.** अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ याचेकडून जीवन चरितार्थ, अन्न, वस्त्र, निवारा यासाठी अर्जदार क्र. १ करीता रक्कम रु.६,०००/- रु. (सहा हजार फक्त) व अर्जदार क्र.२ ते ४ करीता दरमहा प्रत्येकी रक्कम रु.३,०००/- रु. (तीन हजार फक्त) पोटगी मिळावी अशी मागणी केलेली आहे. **मा.सर्वोच्च न्यायालय यांचेकडील खटला रजनेश वि. नेहा, निकाल दिनांक ०४ नोव्हेंबर २०२०** अन्वये पोटगी प्रकरणातील दोन्ही बाजूंचे पक्षकारांनी त्याचे मालमत्ता व दायीत्वे तपशील सादर करणे बंधनकारक आहे. अर्जदारने तिचे मालमत्ता व दायीत्व तपशील नि.क्र.२९ वर दाखल केले आहे. सामनेवाला क्र.१ ने प्रस्तुत अर्जाकामी त्याचे मालमत्ता व दायीत्व तपशील अभिलेखावर दाखल केला आहे. त्याने कथन केले आहे की, त्याच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही.

**२४.** अर्जदार कथन करते की, सामनेवाला क्र.१ हा मिस्त्री काम करीत असुन त्याला दरमहा २० ते २५ हजार उत्पन्न मिळते. तसेच सा.वाला क्र. २ हा मजुरी काम करत असुन त्याला प्रतिमहा १५ ते २० हजार उत्पन्न मिळते. अर्जदारने दाखल केलेला पुरावा विना आव्हानीत राहीलेला आहे. परंतु अर्जदाराने सामनेवाला क्र.१ हा मिस्त्री काम करत असल्याबाबत तिचा तोंडी पुरावा वगळता कोणतेही कागदपत्र सादर केले नाही. त्यामुळे सामनेवाला याचे उत्पन्नाबाबत कागदोपत्री पुरावा

अभिलेखावर दाखल नाही. एकंदरीत सामनेवाला क्र.१ ने अर्जदारांना सांभाळण्यास नकार दिल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार हे मौजे मातकुळी, ता.आष्टी येथे राहील्यापासुन सामनेवाला क्र.१ ने त्यांच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी स्वीकारलेली नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.१ याचेवर वाजवी पोटगी ठेवणे न्यायोचीत वाटते. सामनेवाला क्र.१ हा कामधंदा करत नाही असे मत नोंदविणे न्यायाच्यादृष्टीने योग्य होणार नाही कारण अर्जदाराने शपथवर कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ हा मिस्त्री काम करतो त्याला त्यामधुन २० ते २५ हजार रु. उत्पन्न मिळते. अशा परिस्थितीत जरी सामनेवाला क्र.१ च्या उत्पन्नाबाबत पुरावा अभिलेखावर नसला तरी त्याला रोजगाराच्या संधी उपलब्ध असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावरुन असे निदर्शनात येथे की, अर्जदार हिने शपथेवर कथन केले आहे की, तिला सामनेवाला कडुन दुसऱ्या प्रकरणामध्ये पोटगी मंजुर नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये पोटगीची रक्कम वाजवी असणे न्यायोचित आहे. अन्यथा सामनेवाला याचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे तो अर्जदार क्र.१ ला दरमहा रक्कम रु.२,५००/– (रु. दोन हजार पाचशे फक्त) व अर्जदार क्र.२ ते ४ यांना प्रत्येकी रक्कम रु.१,५००/– (रु. एक हजार पाचशे फक्त) पोटगी देवू शकतो आणि सदरची पोटगीची रक्कम वाजवी आहे. त्यामुळे मुद्दा क्र.३ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

### <u>मुद्दा क्र.४ करीता कारणमिमांसा</u> :–

**२५.** अर्जदाराने शपथेवर असे कथन केले आहे की, ती तिच्या माहेरी राहत आहे. त्यामुळे तिच्या घरभाडयाची व्यवस्था सामनेवाला क्र.१ ने करावी अथवा राहण्याची जागा उपलब्ध करुन द्यावी. प्रस्तुत प्रकरणात आलेल्या पुराव्यावरुन

सामनेवालांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिध्द झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये अर्जदार ही मातकुळी, ता. आष्टी येथे राहत असल्याने सामनेवाला यांचेकडून त्यांना त्रास होण्याची शक्यता आहे अथवा ते असुरक्षित असू शकतात. अशा परिस्थितीत अर्जदार हिने अभिलेखावर ती भाड्याच्या घरात राहत असल्याबाबत कोणताही कागद दाखल केला नाही. त्यामुळे अर्जदार ही मातकुळी, ता.आष्टी येथे सुरक्षित आहे तसेच मुद्दा क्र.२ च्या उत्तरान्वये अर्जदारांबाबत संरक्षीत आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यामुळे घरभाड्याचा आदेश करणे न्यायोचीत वाटत नाही. सबब, मी मुद्दा क्र.४ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.५ करीता कारणमिमांसा</u>** :-

**२६.** अर्जदाराने तिला झालेल्या मानसिक व शारीरिक त्रासाबाबत सामनेवाला यांचेकडून रक्कम रु. २५,०००/- नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. मुद्दा क्र.१ बाबत मी नोंदविलेल्या निष्कर्षावरुन सामनेवाला यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे हे सिध्द झाले आहे. त्यामुळे तिच्यावर झालेल्या हिंसाचाराचे काही अंशी परिमार्जन होणे आवश्यक आहे. सामनेवाला क्र.१ याचे उत्पन्नाबाबतचे कथन अर्जदाराने तोंडी पुराव्यातून केले आहे. अर्जदारावर झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरुप पाहता तसेच अर्जदार ही सामनेवालाकडे नांदल्याचा कालावधी पाहता तसेच सामनेवालाच्या उत्पन्नाचे साधन बघता या प्रकरणात अर्जदार हिला सामनेवाला क्र.१ याचेकडून नुकसान भरपाईपोटी रक्कम रु.२०,०००/-(रु. विस हजार फक्त) देणे योग्य व न्यायोचीत होईल. सबब, मुद्दा क्र.५ चे उत्तर मी अंशतः होकारार्थी नोंदवितो.

## मुद्दा क्र.६ करीता कारणमिमांसा :–

**२७.** मुद्दे क्र.१ ते ५ वरील मी नोंदविलेल्या वरील निष्कर्षावरुन सामनेवाला यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केला ही बाब सिध्द झालेली आहे. त्यामुळे अर्जदार ही संरक्षण आदेश मिळण्यास पात्र असुन अर्जदार क्र.१ ला दरमहा रक्कम रु.२,५००/–(रु. दोन हजार पाचशे फक्त) तसेच अर्जदार क्र.२ ते ४ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.१,५००/– (रु. एक हजार पाचशे फक्त) पोटगी सामनेवाला क्र.१ याचेकडून मिळण्यास पात्र आहे. याशिवाय अर्जदार ही घरभाडे मिळण्यास पात्र नाही. तसेच अर्जदार हे नुकसान भरपाई मिळण्यास पात्र असल्यामुळे प्रस्तुतचे अर्जामध्ये खर्चाबाबत आदेश नाहीत. सबब मुद्दा क्र.६ चे उत्तराकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आ दे श** |
|---|---|
| १. | अर्ज खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | सामनेवाला यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदारांवर कौटुंबिक हिंसाचार होईल असे कोणतेही कृत्य करु नये अथवा असे कृत्य करण्यास कोणालाही प्रवृत्त करु नये. |
| ३. | सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ ला दरमहा रक्कम रु.२,५००/– (रु. दोन हजार पाचशे फक्त) तसेच अर्जदार क्र.२ ते ४ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.१,५००/– (रु. एक हजार पाचशे फक्त) पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक ०४/०३/२०२० पासून देण्यात यावी. |
| ४. | सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार यांना नुकसान भरपाईपोटी रक्कम रु.२०,०००/– (रु. विस हजार फक्त) आदेशापासुन ६० दिवसांच्या आत दयावी. |

| | |
|---|---|
| ५. | प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार, सामनेवाला, संरक्षण अधिकारी व पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन, आष्टी यांना विनामुल्य देण्यात यावी. |
| | (खुल्या न्यायालयात घोषीत.) |

KESHAV KRISHNA KHOMANE
Digitally signed by KESHAV KRISHNA KHOMANE
Date: 2026.05.18 17:04:23 +0530

( **के.के.खोमणे** )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
आष्टी, जि.बीड

ठिकाण – आष्टी
दिनांक – १८/०५/२०२६

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

Dictated on : 18/05/2026
Transcribed on : 18/05/2026
Checked & signed on : 18/05/2026

**Sd/-**
Anant S. Deshmukh,
(Stenographer Grade-III)